**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ च्या अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- १ जुलै, २००५.**

**संदर्भ :- शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.(१७/२०००)/बारा,दिनांक २८ मार्च,२००५.**

# परिपत्रक

राज्य लोकसंख्या धोरणाच्या अंतर्गत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ हे नियम दिनांक २८ मार्च,२००५ पासून अंमलात आले आहेत. त्यासंबंधीची संदर्भाधीन दिनांक २८ मार्च, २००५ ची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २८ एप्रिल,२००५ च्या राजपत्र भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या प्रती सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख याना पाठविण्यात आल्या आहेत.

२. या अधिसूचनेद्वारे शासन सेवेतील गट "अ" ते "ड" मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी अधिसूचनेत विहित केलेली "लहान कुटुंबाची" अतिरिक्त अट लागू झालेली आहे. वास्तव यापुढे शासकीय सेवेत नोकरभरती करताना सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जाईल आणि सदर नियमातील प्रतिज्ञापन नमुना "अ" (मराठी व इंग्रजी नमुने शीघ्र अवलोकनासाठी सोबत जोडले आहेत.) नुसार सर्व उमेदवाराकडून प्रतिज्ञापन घेतले जाईल याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश याद्वारे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सही)

**(बा. बा.नारायणकर)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,

* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ

### प्र ति ज्ञा प त्र
**नमुना-अ**
**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी-----------------------------------------------,

श्री.----------------------------------------याचा/याची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय-----वर्षे,राहणार,-----------------------------------------------------

यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी-----------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला---------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या---------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

सही/-

दिनांक :-

(कृपया मागे पहा....

# Declaration

Form- A

(See Rule- 4)

I, Shri./Smt/Kum ......................................................................

son/daughter/wife of Shri. .......................................................... aged

................ years, resident of --------------------------------------------------

..........................................................................................................

do hereby declare as follows :-

1. That I have filled my application for the post of..........................................

2. I have ......................... (Number) living children as on today. Out of which no. Of children born after 28 th March, 2005 is .................................. .(Mention dates of birth, if any)

3. I am aware that if any total number of living children are more than two due to the children born after 28 th March, 2006 , I am liable to be disqualified for the same post.

Place :-

Date :- Signature

-------

3D:\Desk 12\G.Rgr 26.8.03

एच–592 –23अ.